# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

**Email : vdodehu@gmail.com**

जा.क्र आस्था/ १०२५/ २०२२-२३ दि. ०९/१२/२०२२

## सर्वसाधारण सभा

**नमुना 'अ' (नियम ३ पहा)**

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा **वार शुक्रवार दिनांक.१६/१२/२०२२ रोजी दुपारी १२:३०वाजता** नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे.

**नमूद 'अ' चे जोडपत्र**

**देहू नगरपंचायतीची शुक्रवार दिनांक १६/१२/२०२२ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाज.**

**सभेपुढील विषय .**

१) मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

२) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

३) देहू शहराचा वाढता विकास पाहता घनकचरा व्यवस्थापना करिता सं.न. ९७ (शासकीय गायरान ) येथे वाढीव ५ एकर जागाचा मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे जागा मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४) देहू ग्रामपंचायत सेवानिवृत्त कर्मचारी श्री.तुकाराम कृष्णाजी चिखले व सौ.मिरा जनार्धन चव्हाण यांचे निवृत्ती नंतरचे देयक अदा करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५) स्वच्छ सर्वेक्षण आणि शासनाचे इतर योजनांची पाहणी करणे करता नवनिर्मित देहू नगरपंचायत नगरसेवक / नगरसेविका यांचा पाहणी दौरा निश्चित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६) देहू शहरात स्वच्छ सर्वेक्षण २०२२-२३ करीता GFC व ODF / ODF+ / ODF++ / Water करिता सल्लागार ई. सेवा पुरवणे व शहरात स्वच्छ भारत अभियान करिता लोक सहभाग / लोकचळवळ / जन-जागृती (Citizen Engagement / IEC) सेवा पुरवणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

७) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये समाज कल्याण विभागामार्फत चालू असणारी रमाई घरकुल योजना लागू करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

८) भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करणेसाठी विविध कार्यक्रम व सजावट करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

९) देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नदीवरील पूलानां लोखंडी जाळी बसवणे विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१०)मे.जिओ डिजिटल फायबर प्रा.लि.यांच्या पत्रावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

११) देहू नगरपंचायत हद्दीतील विविध प्रभागांमध्ये लाईटची डीपी (ट्रांसफार्मर घेणे ) बसवणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१२)देहू नगरपंचायत हद्दीतील विठ्ठलवाडी भीमाशंकर सोसायटीकडे जाणारा रस्ता व गाथा मंदि शिवनगरीतून गंधर्व विहारकडे जाणार रस्ता आणि चव्हाणनगर भाग -२ मधील मयूर घनवट ते आनं चव्हाण याच्या घरापर्यंत रस्ता मोबदल्यासाठी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१३)देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी जलशुद्धीकरण केंद्र, देहू नगरपंचायत ऑफिस आणि STP प्लांट तसेच नगरपंचायत मधील सर्व शासकीय ऑफिस मध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१४)देहू नगरपंचायत हद्दीमध्ये विविध वार्डमध्ये रोडची कामे झालेली आहेत. त्या रोड मध्ये पेव्हींग ब्लॉक बसवणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१५)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ३ व ४ मध्ये अंतर्गत रस्ते साईड पट्टे व मधील पट्टे मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१६)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ३ व ४ सरकारी घरकुल ते खंडेलवाल चौक नविन ड्रेनेज लाईन टाकणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१७)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ३ मध्ये ४ (चार सार्वजनिक) शौचालये बांधणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१८)देहू नगरपंचायत हद्दीतील माळीनगर येथील हनुमान मंदिराजवळील समाज मंदिराज व्यायामा साहित्या पुरवणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१९)देहू नगरपंचायत हद्दीतील माळीनगर येथील परदेशी वकील ते नवनाथ देवकर यांच्या घरापर्यंत नवि पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे.

२०)देहू नगरपंचायत हद्दीतील माळीनगर येथील श्रीकृष्ण मंदिरासमोरील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉ बसवणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२१)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१६ माळीनगर येथे नवीन पिण्याच्या पाण्याची नविन टाकी बांधणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२२)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१६ माळीनगर मध्ये नवीन पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२३)देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्राला नैसर्गिकरीत्या वीजनिर्मिती करणेसाठी सोलर सिस्टीम बसवणे करीता विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

२४)देहू नगरपंचायत हद्दीतील वोडकेवाडी येथील स्मशानभूमी सुधारणा (ओटा बांधणे, पत्राशेड, पेव्हींग ब्लॉक बसवणे, जाळी लावणे, पाणी पुरवठा करणे, लाईट बसवणे.) व सुशोभीकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२५)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रवेश रस्त्यावरती कमान (गेट ) उभारणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२६)देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नगर येथील उर्वरित रस्ते कॉंक्रीटीकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२७)देहू नगरपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्ते देहू नगरपंचायतीकडे हस्तांतरण करून दुरुस्ती करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२८)देहू नगरपंचायत नदी सुधार योजने अंतर्गत परिसर सुशोभीकरण व गार्डन करणे व सदरील कामाकरीता तांत्रिक सल्लागार नेमाणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२९)देहू नगरपंचायत हद्दीतील परंडवाल चौक रुंदीकरण करून सुशोभीकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३०)देहू नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्र.११पांडेवाडा येथील रस्ताकरणे व रस्त्याची लेवल करणेबाबत विनिमय करून निर्णय घेणे.

३१)देहू नगरपंचायत हद्दीतील दक्षिण मुखी काळा मारुती मंदिर रस्ता दुरुस्ती करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३२)देहू नगरपंचायत हद्दीत पंडेवाडा व कुंभार वाडा ठिकाणी नविन ड्रेनेज व फुटपाथ करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३३)देहू नगरपंचायत हद्दीत नदीजवळील जाधव सर यांच्या घरासमोरील रस्ता दुरुस्ती करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३४)देहू नगरपंचायत हद्दीत स्वच्छतेबाबत व गोवर संबधित जनजागृती मोहीम राबवणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३५)संत तुकोबाराय चैतन्य विकास समिती यांच्या आलेल्या आरो फिल्टर प्लांट पत्रावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३६)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. १ नगरी दलितेत्तर वस्ती सुधरणा योजना अंतर्गत व इतर योजने अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल उभारणे, विद्युत वाहिनी टेवल भूमिगत करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३७)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ९ मध्ये नगरी दलितेत्तर वस्ती सुधरणा योजना अंतर्गत,नगरोत्थान योजने अंतर्गत रोहित्राची क्षमता वाढवणे, तसेच लघुदाब व उच्चदाब वाहिन्या भूमिगत करणे व त्या अनुषंगिक येणारी कामे करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३८)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक ६ मधील अथर्वविश्व सोसायटी व अजिंक्यतारा सोसायटी मधील रस्ते करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

३९)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक ६ मध्ये सुशोभीकरण करणेबाबत विचार विनिमय करणे.

४०)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१३ बँक ऑफ महाराष्ट्र शेजारील फुटपाथवर पेव्हींग ब्लॉ टाकणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४१)देहू नगरपंचायत हद्दीतील हगवणे आळीतील रस्ता कॉंक्रिटीकरण करणेबाबत विचार विनिमय कर निर्णय घेणे

४२)देहू नगरपंचायत हद्दीतील पोस्ट ऑफिस परीसरातील अतिक्रमणे कढून फुटपाथ वर पेव्हींग ब्लॉ टाकणे व जुने ड्रेनेज नविन ड्रेनेज लाईनला जोडणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४३)मा. अध्यक्ष संत तुकाराम संस्थान यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रावर विचार विनिमय करून नि घेणे.

४४)देहू नगरपंचायत हद्दीतील अंगणवाडी शाळांसाठी निधी उपलब्धता करून देणेबाबत बावत विचा विनिमय करून निर्णय घेणे.

४५)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.८ मध्ये आवश्यक त्या ठिकाणी आवश्कतेनुसार पेव्हींग ब्लॉ टाकणे व सुशोभीकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४६)देहू नगरपंचायत व महिला बाल कल्याण मार्फत होणाऱ्या विविध प्रशिक्षणासाठी मान्यता देणेबा विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४७)देहू नगरपंचायत हद्दीतील अपंग व्यक्तींना मालमत्ता कारामध्ये ५०% सवलत देणे बावत वि विनिमय करून निर्णय घेणे.

४८)विविध कार्यकारी सोसायटी साठी जागा देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४९)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ५ मधील विघ्नहर्ता सोसायटी मध्ये नविन अंडरग्राउंड ड्रे लाईन करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५०)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ५ मधील बाजीराव काळोखे गल्ली व सचिन हगवणे यां घरासमोरील विद्युत वाहिनी लाईन अंडरग्राउंड करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५१)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ५ मधील शिवाजी हगवणे व वसंत हगवणे यांच्या घराप नविन अंडरग्राउंड ड्रेनेज लाईन करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५२)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ५ मध्ये लाईटचे नविन ५० (पन्नास) पोल बसवणेबाबत वि विनिमय करून निर्णय घेणे.

५३)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ५ मधील गोविंद हगवणे व वसंत हगवणे यांच्या घरासमो रस्ता करणे बावत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५४)देहू नगरपंचायत मधील सर्व कर्मचाऱ्यांचे विमा (इन्शुरन्स) काढणेबाबत विचार विनिमय करून नि घेणे.

५५)देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नदीवरील देहूगाव व निघोजेला जाणाऱ्या ठिकाणी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

५६)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१२ बाजार आळी परिसरातील वडाच्या झाडाचा कट्टा, पाण्याची टाकी बांधणे विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५७)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१२ सुतार आळी, सुंदर आळी, महाद्वार चौक,मेन मंदिर परिसर ड्रेनेज दुरुस्ती करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५८)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१२ सुंदर आळी बाजार आळी मधील फुटपाथ दुरुस्ती करून सुशोभीकरण करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५९)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१२ सुंदर आळी, प्रमोद गोलांडे ते माणिक मोरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे

६०)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. १२ सुतार आळी परिसरातील शहाजी बुचुडे ते बाळासाहेब काळोखे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे

६१)मुस्लीम समाजासाठी सं.न. ९७ (शासकीय गायरान ) येथे दफनभूमी साठी जागा निश्चीत करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६२)देहू नगरपंचायत हद्दीतील अनधिकृत नळजोड तपासणी कामी एजन्सी नेमाणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**सौ.स्मिता चव्हाण**
**नगराध्यक्षा**
**देहू नगरपंचायत,देहू**

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.१ :- मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

ठराव क्र.१:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. कोणत्याही सदस्याचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत .

सुचक :- सौ. पूजा सुमित काळोखे .

अनुमोदक :- सौ. पूजा अमोल दिवटे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

---

विषय नं.२ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव क्र.२:- मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले आहे.

सुचक :- श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण

अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण

नगराध्यक्षा

---

विषय नं. ३ :- देहू शहराचा वाढता विकास पाहता घनकचरा व्यवस्थापना करिता सं.न. ९७ (शासकीय गायरान ) येथे वाढीव ५ एकर जागाचा मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे जागा मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. ३ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये वाढती लोकसंख्या व शहराचा वाढता विकास पाहताघनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेसाठी देहू शहरातील स.नं. ९७ या शासकीय जागेमध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेसाठी काम करणे शक्य आहे. सदर घनकचरा व्यवस्थापनेसाठी या पूर्वी मा. जिल्हाधिकारी जि.पुणे यांचेकडे ५ एकर जागा मिळणेबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.परंतु शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता अजून वाढीव एकुण ५ एकर जागेची आवश्यक आहे. ही जागा शासकीय गायराण असल्याने सदर गायराण जागेवर घनकचरा व्यवस्थापनकरीता शासनास जागा मागणी प्रस्ताव सादर करणे अत्यावश्यक आहे. याकरीता घनकचरा व्यवस्थापनकरिता स.नं. ९७ मधील एकुण ५

सौ. स्मिता शैलेश चव्हाण

नगराध्यक्षा

Scanned with OKEN Scanner

एकर जागाआरक्षित करण्यात यावी तसेच मागणीसाठी शासनास प्रस्ताव सादर करणे, सदर जमिनीची शासकीय मोजणी करणे व अनुषंगीक सर्व कामे करणेसाठी या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल.

अनुमोदक :- श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण .

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण

नगराध्यक्षा

---

विषय नं.४ :- देहू ग्रामपंचायत सेवानिवृत्त कर्मचारी श्री.तुकाराम कृष्णाजी चिखले व सौ.मिरा जनार्धन चव्हाण यांचे निवृत्ती नंतरचे देयक अदा करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव ४:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू ग्रामपंचायती कर्मचारी श्री.तुकाराम कृष्णाजी चिखले व सौ.मिराबाई जनार्धन चव्हाण हे कर्मचारी सेवानिवृत्त झाले व त्यानंतर काही दिवसात देहू ग्रामपंचायतीचे शासन आदेशान्वये देहू नगरपंचायती मध्ये दि.०८/१२/२०२० रोजी रूपांतर झाले त्यामुळे त्यांना सेवानिवृत्ती नंतरची कोणतीच देयके अदा करता आली नाहीत.

श्री तुकाराम कृष्णाजी चिखले व सौ.मिराबाई जनार्धन चव्हान यांची सेवा पाहता ग्रॅज्युएटीची रक्कम हि देणे आवश्यक असल्यामुळे श्री.तुकाराम कृष्णाजी चिखले यांची रक्कम ५००००/-............ व सौ.मिराबाई जनार्धन चव्हाण यांची रक्कम ५००००/-............ इतकी होत आहे. अशी माहिती सभागृहात दिली असता त्यावर सविस्तर चर्चा त्यावर खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

सदर कर्मचारी यांनी ग्रामपंचायत असताना काम केलेले आहे. त्यामुळे त्यांना रिटार्यड नंतर मिळणारी सर्व प्रकारची देयके देण्यात यावीत. सदरची देयके देताना व दिल्यानतंर कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याचा सारासार विचार करून देयके देण्यात यावीत असे मत योगेश काळोखे यांनी मांडले.

सदर कर्मचारी यांना नियमा नुसार देण्यात येणारे देयके लवकरात लवकर देण्यात यावीत असे मत गटनेते योगेश परंडवाल यांनी मांडले.

वरील प्रमाणे सविस्तर चर्चा झाली असता श्री.तुकाराम कृष्णाजी चिखले व सौ.मिराबाई जनार्धन चव्हाण यांना सेवानिवृत्ती नंतरची देयके देण्यात यावी अशा स्वरूपाची चर्चा होउन त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येउ ठराव मंजुर करण्यात आला.

सुचक :- योगेश हनुमंत काळोखे.

अनुमोदक :- योगेश बाळासाहेब परंडवाल.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सौ. स्मिता शैलेश चव्हाण

नगराध्यक्षा

Scanned with OKEN Scanner

सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

**विषय नं.५ :- स्वच्छ सर्वेक्षण आणि शासनाचे इतर योजनांची पाहणी करणे करता नवनिर्मित देहू नगरपंचायत नगरसेवक / नगरसेविका यांचा पाहणी दौरा निश्चित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव ५:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. शासना आदेशान्वये सर्व महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत मध्ये स्वच्छ सर्व्हेक्षण अभियान राबविण्यात येत असुन त्याअंतर्गत विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत त्यामधील एक महत्वाचा घटक म्हणजे घनकचरा संकलन व त्याचे योग्य प्रकारे विघटन याचे योग्य ते व्यवस्थापनासाठी विविध नगरपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका यांनी चांगल्या प्रकारचे नियोजन केले आहे याची माहिती तसेच शासना व्दारे इतर विविध प्रकारच्या योजना राबविल्या जात आहे. त्या योजनांच्या अनुषंगाने करण्यात आलेली कामे याची सर्वांची माहिती घेतली गेल्यास आपल्या इथेही उत्तम प्रकारचे काम करणे सोपे होईल त्यासाठी ज्या ठिकाणी उत्तम प्रकारे घनकचऱ्याचा प्रकल्प राबविण्यात आलेला आहे. अशा एका नगरपंचायत किंवा नगरपरिषदेच्या पाहणी दौऱ्याचे नियोजन करण्यात यावे अशा स्वरूपाची चर्चा झाली या दौऱ्यासाठी नगरपंचायतीची सर्व कार्यकारीणी तसेच आवश्यक पदाधिकारी व कर्मचारी यांनी मिळुन पहाणी दौरा करण्यात यावा या साठी होणाऱ्या खर्चास हि सभा वित्तीय व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल.
अनुमोदक :- श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण .

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत**
**सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२**

**सौ. स्मिता शैलेश चव्हाण**
**नगराध्यक्षा**

---

**विषय नं.६ :- देहू शहरात स्वच्छ सर्वेक्षण २०२२-२३ करीता GFC व ODF / ODF+ / ODF++ / Water करिता सल्लागार ई. सेवा पुरवणे व शहरात स्वच्छ भारत अभियान करिता लोक सहभाग / लोकचळवळ / जन-जागृती (Citizen Engagement / IEC) सेवा पुरवणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र.६ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू शहर हे महाराष्ट्रातील नामांकित तीर्थक्षेत्रांपैकी एक शहर असून भाविक भक्त लाखोंच्या संख्येने देहू शहरात येत असतात, अश्यात देहू नगरपंचायतने स्वच्छ सर्वेक्षण वर लक्ष केंद्रित केल्यास देहू शहराचा विकास चांगल्या गतीने होण्यास मदत होणार आहे. देहू नगरपंचायत आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाप्रमाणे सन २०२२-२३ माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण अभियान २.० अंतर्गत नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या टूलकिट नुसार तसेच केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेश व निर्देशनानुसार राज्य व राष्ट्रीय स्तरावर उच्च व चांगले मानांकन प्राप्त करण्यासाठी व भरीव कामगिरी करण्यासाठी तसेच कचरामुक्त शहराचे तारांकित मानांकन या स्पर्धात्मक अभियानामध्ये सर्वोत्तम कामगिरी करण्याच्या अनुषंगाने न.प. कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने सदरची कामे करणे अत्यावश्यक आहेत.

**सौ. स्मिता शैलेश चव्हाण**
**नगराध्यक्षा**

Scanned with OKEN Scanner

वरील सर्व बाबींचा विचार करता माझी वसुंधरा अभियान ३.०, स्वच्छ सर्वेक्षण अभियान २.०, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन व इतर स्वच्छ सर्वेक्षण अनुषंगिक प्रकल्पांकरिता त्रेयस्त सल्लागार संस्थेची नेमणूक करणे गरजेचे असून या कामाला ला हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस, निविदा मागवणेस व या कामी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते देत आहे.

सुचक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल.
अनुमोदक :- श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण .

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

**विषय नं.७:-** देहू नगरपंचायत हद्दीमध्ये समाज कल्याण विभागामार्फत चालू असणारी रमाई घरकुल योजना लागू करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ७** :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये समाज कल्याण विभागामार्फत चालू असणारी रमाई घरकुल योजना लागू करताना जे लोक बेघार आहेत व त्यांच्या स्वताच्या मालकीची जागा आहे पण त्यांची घर बांधकामा करण्या करीत आर्थिक परिस्थिती नाही अशा व्यक्तींना / नागरिकांनी या योजनेचा लाभ घेता येईल. यासाठी नागरिकांना आव्हान करण्यात यावे.

रमाई घरकुल योजना लागू करण्याकरिता ज्या शासकीय नियम व अटी असतील त्याप्रमाणे योग्य ती कारवाही करण्यात येईल यावी. अशा चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ.पूजा अमोल दिवटे
अनुमोदक :- श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

**विषय नं.८:-** भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करणेसाठी विविध कार्यक्रम व सजावट करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. ८ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. भारतीय प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी संपुर्ण भारत देशात मोठया उत्साहात व धुमधडाक्यात साजरा केला जात

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा



Scanned with OKEN Scanner

असतो. देहू नगरपंचायतीने पण प्रजासत्ताक दिन मोठया उत्साहात साजरा करावा यावर नगरपंचायत कार्यालयाला फुलांची सजावट करण्यात यावी व संपुर्ण लाईटिंग करण्यात यावी. तसेच मुख्य कमान ते आंबेडकर चौक ते वैकुठ गमन मंदिर या रस्यावरील सर्व स्ट्रिट लाईट पोलला तिरंगी झेंडयाच्या कलर मधील एल.ई.डि. लाईटिंग करण्यात यावी. मुख्य मंदिर ते चौदा टाळकरी कमान तसेच संत तुकाराम हायस्कुल ते गाथामंदिर येथील स्ट्रिट लाईट पोलवर पण एल.ई.डि. बल्बची लाईटिंग करण्यात यावी असे मत श्री.योगेश काळोखे यांनी मांडले.

एल.ई.डि. लाईटिंग करताना गावातील सर्व पोलला करता आली तर पहाणे जेणे करून संपुर्ण गावठाण परिसर उजळुन निघेल व संपुर्ण गावातील वातावरण एक वेगळया प्रकारचे तयार होईल. यासाठी किती पोल आहेत याचा सर्व्हे करण्यात यावा व एक पोलच्या एल.ई.डि. साठी किती खर्च येतो यावरून संपुर्ण पोलच्या खर्चाचा अंदाज येईल असे मत योगेश परंडवाल यांनी मांडले

यावर सविस्तर चर्चा होउन स्ट्रिट लाईट पोलवर एल.ई.डि. लाईट साठी संपुर्ण पोलचा येणाऱ्या खर्चाचा अंदाज घेउन सदरचा संपुर्ण गावातील पोलला करण्या पेक्षा मुख्य रस्त्यांच्या पोलला करण्यात यावी. त्यासाठी निविदा प्रक्रिया करून देहू नगरपंचायत कार्यालया सजावट व लाईटिंगचे काम देण्यात यावे. व लाईटिंग करून घेण्यात यावी. तसेच मुख्यकमानीला लाईटिंग करण्यात यावे. कमीनी च्या चौकातील पोलला एल.ई.डि. लाईटिंग तिरंग्यामध्ये लावण्यात यावीण् अशा स्वरूपाची चर्चा होईन होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक :- योगेश हनुमंत काळोखे.
अनुमोदक :- योगेश बाळासाहेब परंडवाल.

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत**
**सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२**

**सौ. स्मिता शैलेश चव्हाण**
**नगराध्यक्षा**

---

**विषय नं.९ :- देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नदीवरील पूलानां लोखंडी जाळी बसवणे विचार विनिमय करून निर्णय घेणे..**

**ठराव क्र. ९** :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तिर्थक्षेत्र असुन शहराच्या बाजूने पवित्र अशी इंद्रायणी नदी वहात आहे. देहू हे तिर्थक्षेत्र असल्याने वर्षभर भाविकांची गर्दी असते. तसेच शहराचा परिसर वाढत असुन सर्व जाती धर्मांचे लोक इथे रहात आसुन सर्व धार्मिक सण मोठया उत्साहात साजरे केले जातात सण साजरे केल्यानंतर तयार होण्यारे निर्माल्य हे नदीवर असणाऱ्या पुलावरून नदी पात्रात टाकले जातात. तसेच येणारे जाणारे भाविक पण नदी पुलावरून निर्माल्य व इतर वस्तु नदी पात्रात टाकत असतात. एक दोन वेळा नदी पुलावरून उडी मारून अत्महत्या करण्याचा प्रयत्न पण करण्यात आलेला आहे. तसेच वर्षातुन तीन मोठया यात्रा भरत असुन लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात त्यांच्या कडून पुलाचा वापर होत असतो.त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच पवित्र अशा इंद्रायणी मातेचे पावित्र राखण्यासाठी नदीपात्रावर असणाऱ्या पुलांना लोखंडी जाळया बसविल्यास नदी पात्रात पुलावरून कोणीही

Scanned with OKEN Scanner

नेर्माल्य व इतर राडाशेटा टाकला जाणार नाही तरी नदी पात्रावर असणाऱ्या ४ पुलांना लोखंडी जाळ्या बसविण्यात याव्यात अशा स्वरुपाची चर्चा होउन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असे.

सुचक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल

अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

**विषय नं.१० :- मे.जिओ डिजिटल फायबर प्रा.लि.यांच्या पत्रावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. १०:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. मे.जिओ डिजिटल फायबर प्रा.लि.यांनी डिजिटल फायबर केबल अंडरग्राउंडकरणे कामी देहू नगरपंचायत कार्यालयाकडे दिनांक ३१/१०/२०२२ रोजी अर्ज दाखल केला होता. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये सविनय मोटार्स ते विघ्नहर्ता कॉलनीपर्यंत एकूण ३२०० र.मी.ओपटीकल फायबर केबल टाकणेकरिता मे जिओ डीजीटल प्रा.लि यांनी देहू नगरपंचायत कार्यालयाकडे दिनांक ३१/१०/२०२२ रोजी अर्ज दाखल केला होता. तसेच सदर प्रस्तावित कामाचा नकाशा तयार सादर केला आहे. मे. जिओ डीजीटल प्रा.लि यांनी सदर नकाशामध्ये वरील दिलेल्या ठिकाणी ओप्टीकल फायबर केबल टाकणेसाठी रस्ता खोदाई करिता परवानगी मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर परवानगी नुसार देहू नगरपंचायतीच्या आर्थिक उत्पनात वाढ होणार असल्याने मे.जिओ डिजिटल प्रा.लि यांचेकडून वरील ठिकाणी ओप्टीकल फायबर केबल टाकणेसाठी नियमानुसार अनुशेष होणारे एकूण ३२०० र. मी . करिता प्रती ७००/- र.मी प्रमाणे रक्कम रुपये २२,४०,०००/- (बावीस लक्ष चाळीस हजार) या प्रमाणे शुल्काचा धनाकर्ष व सुरक्षा अमानत रकाम रुपये ५,००,००० इतकी बॉक ग्यारंटी नगरपंचायत कार्यालयास भरणा करावी. तसेच केबल अंडरग्राउंड करतेवेळी खोदकाम केलेला रस्ता पुर्वात करणेची सर्वस्वी जबाबदारी ही मे.जिओ डिजिटल फायबर प्रा.लि यांची राहील. त्यानंतर परवानगी देणेस या ठरावान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.पूजा सुमित काळोखे

अनुमोदक :- सौ.पूजा अमोल दिवटे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

Scanned with OKEN Scanner

विषय नं.११:- देहू नगरपंचायत हद्दीतील विविध प्रभागांमध्ये लाईटची डीपी (ट्रांसफार्मर घेणे ) बसविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.११ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील विविध वार्ड मध्येलाईटचा ट्रांसफार्मर जे आहे त्यावर मोठ्या प्रमाणात लोड ( भर ) पडत आहे त्या कारणाने या वार्डातील लोकांना वीज पुरवठा सतत विस्कळीत होत आहे . त्यामुळे सदर वार्ड क्र ५,६,७,८,१४, मध्ये नवीन डीपी ट्रांसफार्मर बसविल्यामुळे पाच वार्डातील लाईट प्रश्न सुटणार असल्याचे मा. बांधकाम सभापती योगेश काळोखे यांनी सांगितले.

सदर काम देहू नगरपंचायत स्थानिक निधी उपलब्धेतेनुसार निविदा प्रक्रिया करणे या सर्व प्रकारची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन या कमी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे .

सुचक :- श्री. योगेश हनुमंत काळोखे
अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

विषय नं.१२ :- देहू नगरपंचायत हद्दीतील विठ्ठलवाडी भीमाशंकर सोसायटीकडे जाणारा रस्ता व गाथा मंदिर शिवनगरीतून गंधर्व विहारकडे जाणार रस्ता आणि चव्हाणनगर भाग -२ मधील मयूर घनवट ते आनंद चव्हाण याच्या घरापर्यंत रस्ता मोबदल्यासाठी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १२ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील विठ्ठलवाडी भीमाशंकर सोसायटीकडे जाणारा रस्ता व गाथा मंदिर शिवनगरीतून गंधर्व विहारकडे जाणारा रस्ता आणि चव्हाणनगर भाग-२ मधील मयूर घनवट ते आनंद चव्हाण या रस्त्यासंदर्भात समिती स्थापन करणे. नागरिकांनमध्ये व शेतकऱ्यान मध्ये समन्वय बैठक घेऊन त्याचे अहवाल सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा व त्यानंतर सर्वानुमते समिती स्थापन करावी.

सदर प्रकारची वैधानिक कार्यवाही पुर्ण करून प्रशासकीस व वित्तीय मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणेकामी या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.पूजा सुमित काळोखे
अनुमोदक :- सौ.पूजा अमोल दिवटे

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

Scanned with OKEN Scanner

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

---

**विषय नं.१३ :- देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी जलशुद्धीकरण केंद्र, देहू नगरपंचायत ऑफिस आणि STP प्लांट तसेच नगरपंचायत मधील सर्व शासकीय ऑफिस मध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. १३ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत कार्यालयात दैनंदिन विविध विभागात असुन त्यामार्फत कामकाज सुरु आहे त्यांच्या कागदपत्रांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नगरपंचायत कार्यालयात, तसेच बोडकेवाडी जलशुद्धीकरन देहू या ठिकाणातुन संपुर्ण गावाला शुद्ध पाण्याचा पुरवठा केला जात आहे.तेथील परिसर मोठा आहे.जॅलवेल विहीर तेथील मोटारी, जलशुद्धीकरण प्लॉट तेथील विभाग हा अत्यंत महत्वाचा आहे याठिकाणी दिवस रात्र अशा दोन्ही वेळेस डयुटया असतात व इतरचा परिसर हा नदी पात्रा नजीक असल्यामुळे तेथील सुरक्षितता महत्वाची आहे. तरी सर्व आवश्यक ठिकाणी सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे.

सदर प्रकारची वैधानिक कार्यवाही पुर्ण करून प्रशासकीस व वित्तीय मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणेकामी या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल
अनुमोदक :- प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

**विषय नं.१४ :- देहू नगरपंचायत हद्दीमध्ये विविध वार्डमध्ये रोडची कामे झालेली आहेत. त्या रोड मध्ये पेव्हींग ब्लॉक बसवणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. १४ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यायत आला त्यारवर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये विविध वार्डमध्ये रोडची कामे झालेली आहेत व होत आहेत त्या रोडला काही मीटर अंतरावर पाणीपुरवठा लाईन व ड्रेनेज लाईन साठी जागा सोडल्या आहेत त्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे गरजेचे आहे.प्रत्येक प्रभागाचा सर्वे करून आवश्यक त्याठिकाणी आवश्यकतेनुसार पेव्हींग ब्लॉक बसविणे. तसेच नगरपंचायतमध्ये जे जुने पेव्हिंग ब्लॉक आहेत. तेच ब्लॉक समसमान वापर प्रत्येक प्रभागात करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

या सर्व प्रकारची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन या कमी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे .

सुचक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे
अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

**विषय नं.१५:- देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ३ व ४ मध्ये अंतर्गत रस्ते साईड पट्टे व मधील पट्टे मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. १५ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यायत आला त्यारवर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र मध्ये अंतर्गत रस्ते साईड पट्टे व मधील पट्टे मध्ये ४व ३. पेव्हींग ब्लॉक नसल्याने या परिसरातील नागरिकांकडून सदर ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविण्यासाठी नगरपंचायतीस तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

त्या अनुषंगाने देहू नगरपंचायत हद्दीमध्येविविध वार्डमध्ये रोडची कामे झालेली आहेत व होत आहेत त्या रोडमध्ये.पेव्हींग ब्लॉकबसविणे गरजेचे आहे.प्रत्येक प्रभागाचा सर्वे करून गरजेनुसारव आवश्यकतेनुसार पेव्हींग ब्लॉकबसविणे. तसेच नगरपंचायतमध्ये जे जुने पेव्हिंग ब्लॉक आहेत. तेच ब्लॉक समसमान वापर प्रत्येक प्रभागात करण्यात यावा.

या सर्व प्रकारची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन मा.जिल्हाधिकारी सो.,पुणे यांची परवानगी घेवून या कमी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.पूजा सुमित काळोखे
अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

Scanned with OKEN Scanner

विषय नं.१६ :- देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ३ व ४ सरकारी घरकुल ते खंडेलवाल चौक नवीन ड्रेनेज लाईन टाकणे बावत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १६ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र ३ व ४ मध्ये सरकारी घरकुल व खंडेलवाल चौकापर्यंत जुनी ड्रेनेज लाईन पूर्णपणे खराब झालेली आहे या संदर्भात या परिसरातील नागरिकांकडून सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेसाठी नगरपंचायतीस मागणी प्राप्त अर्ज झाले आहेत. सदर ठिकाणी रोगराई पसरुन साथीचे आजार होण्याची शक्यता आहे त्यामुळे त्या भागात नवीन ड्रेनेज लाईनचे काम करणे आवश्यक आहे.

या सर्व प्रकारची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन मा.जिल्हाधिकारी सो.,पुणे यांची परवानगी घेवून या कमी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.पूजा सुमित काळोखे
अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

विषय नं.१७:- देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ३ मध्ये ४ (चार सार्वजनिक) शौचालये बांधणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १७ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र ३ मध्ये ४ मध्ये (सार्वजनिक) शौचालय बांधणे अत्यंत गरजेचे आहे. सार्वजनिक शौचालय नसल्याने तेथील लोकांची गैरसोय होत आहे. या संदर्भात सदर परिसरातील नागरिकांकडून या ठिकाणी सार्वजनिक शौचालय तयार करणेसाठी नगरपंचायतीस तक्रारी प्राप्त झालेल्या आहे.

सदर जागेची स्थानिक नगरसेवकांना घेऊन स्थळ पाहणी करून जागा निश्चित करणे सदर सर्व प्रकारची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन मा.जिल्हाधिकारी सो.,पुणे यांची मान्यता घेवून या कमी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.पूजा सुमित काळोखे
अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

Scanned with OKEN Scanner

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

**विषय नं.१८ :- देहू नगरपंचायत हद्दीतील माळीनगर येथील हनुमान मंदिराजवळील समाज मंदिराज व्यायामाचे साहित्य पुरवणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. १८ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हददीतील माळीनगर येथील हनुमान मंदिराजवळील समाजमंदीरामध्ये व्यायामाचे साहित्य बसविल्यास आजु बाजुच्या परिसरातील नागरि कांना त्याचा खुपच फायदा होईल आरोग्याच्या दुष्टीने व्यायाम हा खुपच महत्वाचा असुन प्रत्येक नागरिकांनी तो केलाच पाहिजे. स्थानिक नगरसेवक यांना घेवून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून व्यायाम साहित्य ठेवुन व्यायामासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे की नाही याची पाहाणी करण्यात यावी.

सदर ठिकाणी व्यायाम साहित्य मिळण्यासाठी जिल्हा क्रिडा विभाग यांच्याकडे व्यायाम साहित्य मागणीचा प्रस्ताव पाठवण्यात यावा व सर्व प्रकारची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून होण्याचा आर्थिक खर्चास या ठरावान्वये विकास शुल्क निधीतून करण्यास प्रशासकिय व वितीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :-श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण
अनुमोदक :-श्री.प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक१६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

**विषय नं.१९:- देहू नगरपंचायत हद्दीतील माळीनगर येथील परदेशी वकील ते नवनाथ देवकर यांच्या घरापर्यंत नविन पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे.**

ठराव क्र. १९ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. दरील विषयावर सभागृहात चर्चा करण्यात आली. माळीनगर येथील परदेशी वकील ते नवनाथ देवकर यांच्या भागात पाणीपुरवठ्या बाबतीत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत असून, सदर भागातील तक्रार दूर करणेकरिता या भागात नवीन पिण्याची पाईपलाईन टाकणे गरजेचे आहे. या कामी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते देत आहे.

सुचक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल
अनुमोदक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

Scanned with OKEN Scanner

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

विषय नं.२० :- देहू नगरपंचायत हद्दीतील माळीनगर येथील श्रीकृष्ण मंदिरासमोरील मोकळ्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसवणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. २० :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.सदरच्या जागाचा सीटी सर्व्हे हा ग्रा.पं च्या नावाने असून जागा नगरपंचायतीच्या नावे करून घेऊन सदर ठिकाणी काम करण्यात यावे.अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ.प्रविण रामदास काळोखे
अनुमोदक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

विषय नं.२१ :- देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१६ माळीनगर येथे नवीन पिण्याच्या पाण्याची नविन टाकी बांधणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. २१ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीचे विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. देहू शहरात बऱ्याच भागात पाणीपुरवठा विस्कळीत असून नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायतकडे येत आहेत. माळवाडी येथील लोकसंख्या देखील झपाट्याने वाढत आहे. सद्य स्थितीत माळवाडी येथे नवीन एकच उंच पाण्याची टाकी व जुनी उंच पाण्याची असून त्यावरून होणारा पाणीपुरवठा माळवाडी येथील काही भागात कमी प्रमाणात होत आहे. याकारणी नवीन टाकी बांधल्याने माळवाडी येथील पाणी प्रश्न सोडविण्यास मदत होणार असून सदर टाकीची जागेची पाहणी करून तसेच त्या अनुषंगाने पाईपलाईन टाकणे व इत्यादी आवश्यक कामे करणे याचे अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस, निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे .

सदर कामाचा खर्च विकास शुल्क निधीतून करण्यात यावा.

सुचक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल
अनुमोदक :- सौ.पूजा अमोल दिवटे

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

Scanned with OKEN Scanner

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

---

**विषय नं.२२ :- देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१६ माळीनगर मध्ये नवीन पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. २२ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीचे विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात बऱ्याच भागात पाणीपुरवठा विस्कळीत असून नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायत कडे येत आहेत. माळवाडी भागात पाहणी केली असता पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे गरजेचे आहे. यात प्रामुख्याने, सावतामाळी मंदीर परिसर, साहेबराव परंडवाल ते गुलमोहर सोसायटी परंडवाल सिटी, श्रीकृष्ण मंदिर परिसर या भागातील तक्रारी जास्त असून सदर ठिकाणच्या पाईपलाईन करणे गरजेचे असून सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस , निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे .

सुचक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल
अनुमोदक :- सौ.पूजा सुमित काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

**विषय नं.२३ :- देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्राला नैसर्गिकरीत्या वीजनिर्मिती करणेसाठी सोलर सिस्टीम बसवणे करीता विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. २३ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू शहराकरिता होणारा पाणीपुरवठा हा बोडकेवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्रावरून केल जात असून सदर ठिकाणी ३५ HP चे २ पंप, १२० HP चे २ पंप, ३.५ द.ल.ली जलशुद्धीकरण केंद्र येथील विविध मशिनरी तसेच जलशुद्धीकरण केंद्राभोवतीचे पथदिवे, हायमास असे सगळे युनिट केंद्रावर आहेत. सद्य स्थितीत चालू कालावधीत प्रत्येकी महिना सरासरी ४ ते ५ लक्ष विद्युतीकरणाचे वीज बिल देहू नगरपंचायत महावितरणास अदा करते. बोडकेवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्रावर सोलर सिस्टीम बसविनेची योजना केल्यास सदरचा होणारा वीज बिल खर्च बचत होणार असून याचा आर्थिक फायदा देहू नगरपंचायतीस होणार आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून प्रस्ताव राज्य शासनाकडून मंजूर करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस, निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे .

Scanned with OKEN Scanner

सदर कामाचा खर्च राज्य शासनाकडून येणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

सुचक :- श्री. मयूर दत्तात्रय शिवशरण
अनुमोदक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

**विषय नं.२४ :- देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील स्मशानभूमी सुधारणा (ओटा बांधणे, पत्राशेड, पेव्हींग ब्लॉक बसवणे, जाळी लावणे, पाणी पुरवठा करणे, लाईट बसवणे.) व सुशोभीकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. २४ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हददीतील बोडकेवाडी येथील नागरिकांसाठी याचा वापर करण्यात येतो. स्मशानभुमी परिसर हा नदी काठाला लागुन असुन वाडी पासुन थोडया अंतरावर आहे. ग्रामपंचायत कार्यकाळात येथील कामे करण्यात आलेली असुन त्यानंतर त्याठिकाणी कोणतीच कामे झालेली नाहीत त्यामुळे त्याठिकाणी खुप गोष्टीची आवश्यकता भासत असुन सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यामध्ये ओटा बांधणे, पत्राशेड, पेव्हींग ब्लॉक बसवणे, जाळी लावणे, पाणी पुरवठा करणे, लाईट व्यवस्था करणे व अजुबाजुचा परिसर सुशोभिकरण करणे गरजेचे आहे.

सदरची कामे करण्यात पुर्वी स्थानिक नगरसेवकांना बरोबर घेउन स्मशानभुमीची पहाणी करण्यात यावी व कोण कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे याचा अहवाल तयार करण्यात यावा व त्याप्रमाणे तेथील कामे करण्यात यावी अशा स्वरुपाची चर्चा होउन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली.

सुचक :- सौ.पूजा सुमित काळोखे.
अनुमोदक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल.

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

---

**विषय नं.२५ :- देहू नगरपंचायत हद्दीतील प्रवेश रस्त्यावरती कमान (गेट ) उभारणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

Scanned with OKEN Scanner

ठराव क्र. २५ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये शहराच्या विविध मुख्य रस्त्याच्या ठिकाणी कमान उभारणे बावत नगरपंचायत कार्यालयामध्ये मागणी अर्ज प्राप्त होत असते. अशा प्राप्त होणाऱ्या मागणी अर्जांच्या अनुषंगाने नगरपंचायत द्वारे ना-हरकत देण्यात येऊन कमान बांधकाम करणाऱ्या नागरिकांने/ मागणी धारकाने/ अर्जदाराने स्वतःच्या वैयक्तिक नावाची अथवा इतर व्यक्तीच्या नाव / नावे न देता केवळ कमान उभारावी आणि छोट्या नमुन्यात कमानीच्या दर्शिनी भागात नाव न लावता सौजन्य म्हणून कमानीच्या बाजून नाव लावण्यात यावे. कमान लावताना कमानीचे आराखडे,आर.सी.सी डिझाईन व इतर अनुषंगिक बाबीची पूर्तता करूनच कमानीस परवानगी ना हरकत देण्यात यावी.अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे
अनुमोदक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल.

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

---

विषय नं.२६ :- देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नगर येथील उर्वरित रस्ते कॉंक्रीटीकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. २६ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नगर येथील रस्त्याची फार मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने ठीक ठिकाणच्या परिसरातील नागरिकांनी देहू नगरपंचायतीकडे सदर रस्त्याच्या समस्याबाबत वारंवार तक्रारी केलेल्या आहेत सदर कामाचे अंदाज पत्रक तयार करून व सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन सदर कामकाज पूर्ण करण्यास व या कामी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वितीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल.
अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

Scanned with OKEN Scanner

**विषय नं.२७ :- देहू नगरपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्ते देहू नगरपंचायतीकडे हस्तांतरण करून दुरुस्ती करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. २७ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद व सार्वजनिक विभाग रस्त्यावरील अतिक्रमणे काढून घेऊन सदर रस्त्याची हद्द दाखवून घेणे व मार्किंग करून रस्त्याची जागा ताब्यात घेणे या रस्त्याची फार मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने ठीकठिकाणच्या परिसरातील नागरिकांनी देहू नगरपंचायतीकडे सदर रस्त्यावरील वाढलेल्या समस्याबाबत वारंवार तक्रारी केलेल्या आहेत. तरी सदर कामाचे अंदाज पत्रक तयार करून व सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन सदर कामकाज पूर्ण करण्यास व या कामी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वितीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे
अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

---

**विषय नं.२८ :- देहू नगरपंचायत नदी सुधार योजने अंतर्गत परिसर सुशोभीकरण व गार्डन करणे व सदरील कामाकरीता तांत्रिक सल्लागार नेमणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. २८ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नदी येथे सुशोभीकरण व त्या अनुषंगिक कामे करणे करिता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमण्यात यावा. प्रकल्प व्यवस्थापक सल्लागारामार्फत सुशोभिकरण करून गार्डन करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा आणि त्या नुसार पुढील कार्यवाही करणे.अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे
अनुमोदक :- श्री.प्रविण रामदास काळोखे

सौ. स्मिता शैलेश चव्हाण
नगराध्यक्षा

Scanned with OKEN Scanner

ठराव सर्वानुमते मंजूर
नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत,देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२२

---

**विषय नं.२९ :- देहू नगरपंचायत हद्दीतील परंडवाल चौक रुंदीकरण करून सुशोभीकरण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव क्र. २९ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतीची वाढती लोकसंख्या तसेच आजुबाजुचा औदयोगिकरणचा परिसरामुळे तीर्थक्षेत्र विकास आराखडयातुन करण्यात आलेल्या बाहयवळण रस्तामुळे या रस्तावरुन संपुर्ण वाहतुक सुरू असते. या बहायवळण रस्तावर मध्यभागी परंडवाल चौक येत असुन या ठिकाणी चाकण एम.आय.डी.सी मधून येणारी वाहने देहू-देहूरोड मार्गी मुंबई हायवेकडे जाणारी वहाने, तळवडेकडुन येणारी वहाने देहूफाटा, येलवाडी कडुन येणारी वहाणे व देहू गावातुन बाहेर जाणारे वहाने या चौकातुन जात असल्यामुळे या ठिकाणी दररोज वहानांची खुप मोठ्या प्रमाणात लांबच-लांब रांगा लागतात.या ठिकाणी असणारा कापुर ओठयावरील पुल हा सदयास्थितीत लहान पडत असल्यामुळे देहुरोड कडून येणारी व देहुरोड कडे जाणारी वहाने यांना खुपच अडचण निर्मान होत आहे. यासाठी यापुलाचे रुंदीकरण करण्यात यावे. यापुलाला समांतर असा नविन पुल बांधण्यात यावा यासाठी लागणारी आवश्यक ती सर्व बाबींची पुर्तता करून पुलाचे काम करण्यात यावे.

लोकवर्गणीतून विविध कंपन्यांकडून CSR फंडातून परंडवाल चौक सुशोभिकरण करण्यात यावा या कामी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वितीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- योगेश बाळासाहेब परंडवाल.
अनुमोदक :- योगेश हनुमंत काळोखे.

ठराव सर्वानुमते मंजूर
